जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर

दूरध्वनी ०२४१-२४११२१२ Email dionagar12@gmail.com Fax ०२४१- २४२७३७३

वृत्तपत्राचे नांव - सामना दिनांक १५ / २/ २०१४

# आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी मतदार नोंदणी करून घ्यावी



नगर, दि. १४ (प्रतिनिधी) - आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी मतदारांना नावनोंदणीसाठी अंतिम संधी राहणार आहे. जिल्ह्यातील मतदारयाद्या अद्ययावत करताना ज्या मतदारांची नावे चुकीने वगळली आहेत किंवा १८ वर्षे पूर्ण होत आहेत, अशा मतदारांनी मतदार नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

अग्रवाल म्हणाल्या, जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांच्या याद्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यामार्फत घरोघरी तपासणी केली असता, काही मतदार मृत, स्थलांतरित, दुबार, मिसिंग आढळून आले आहेत. अशा मतदारांबाबतीत सर्व मतदारसंघांमध्ये वगळणीबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. मृत मतदारांची नावे वगळणी करताना बीएलओचा अहवाल, स्थानिक स्वराज्य संस्थेचा मृत्यू दाखला किंवा फॉर्म नं. ७ द्वारे नावे कार्यवाही सुरू आहे.

स्थलांतरित मतदारांबाबतीत त्यांचा नवीन पत्ता माहिती असेल तर नवीन पत्त्यावर नोटीस देऊन सुनावणीद्वारे नावे वगळण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. स्थलांतरित मतदारांचा पत्ता माहीत नसेल तर शेवटच्या माहीत असलेल्या पत्त्यावर पंचनामा करून नोटीस डकवणे आणि वृत्तपत्रात नोटीस देऊन नाव वगळण्याबाबत कार्यवाही केली आहे.

दुबार मतदारांच्या बाबतीत नोटीस देऊन सर्वसाधारण वास्तव्याच्या ठिकाणचे नाव मतदारयादीत ठेवून दुसरे नाव वगळण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. वगळलेल्या मतदारांच्या नावांची यादी तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, नगरपालिका कार्यालय, महापालिका व त्यांचे वॉर्ड कार्यालय येथे डकवून प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.

अंतिम मतदारयाद्या संबंधित सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास उपलब्ध आहेत. तसेच, सर्व तहसील कार्यालयांत मतदार मदत केंद्र स्थापन करण्यात आलेले आहेत, असे अग्रवाल यांनी सांगितले.